# तहसिलदार कार्यालय महाड

जिल्हा - रायगड

# लोकशाही दिन

---

सन 1999 पासून सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक प्रसुधा-1099/सीआर-23/99/18-अ दिनांक 29/12/1999 अन्वये जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली लोकशाही दिन आयोजीत करणेत येत होता सदर लोकशाही दिनात नागरीकांचे तक्रारीचे निवारण झाले नाही तर जनतेला न्याय मिळणेसाठी शासन परिपत्रक क्र.प्रसुधा/1001/प्रक्र70/2001/18-अ दिनांक 10/11/2001 अन्वये मंत्रालय लोकशाही दिन मा. मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली आयोजीत करणेत येत आहे.

त्यानंतर सदर कार्यपध्दतीत सुधारणा होवून शासन परिपत्रक क्र.प्रसुधा/1002/ सीआर-69/2002/18-अ दिनांक 22/07/2002 अन्वये महिन्याच्या दुस-या सोमवारी विभागीय स्तरावर मा. विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली लोकशाही दिन आयोजीत करणेत येत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संबंधातील नागरीकांचे तक्रारीचे निवारण जलद गतीने होण्यासाठी शासन परिपत्रक क्रमांक महालो/1007/212/प्रक्र.53/07/18-अ दि 7/11/ 2007 अन्वये बृहनमुंबई पुणे व नागपूर या महानगरपालिका प्रमाणेच उर्वरीत सर्व महानगरपालिकांमध्ये महिन्याच्या पहिल्या सोमवारी महानगरपालिका लोकशाही दिन आयोजीत करणेत येतो.

शासन परिपत्रक क्रमांक क्र.प्रसुधा/2011/प्रक्र.189/11/18-अ दि 26/9/2012 अन्वये तालुका जिल्हा महानगरपालिका विभागीय मंत्रालय स्तरावरील लोकशाही दिन अंमलबजावणीबाबत एकत्रित आदेश निर्गमित करणेत आलेले आहेत.

# लोकशाही दिन खालीलप्रमाणे आयोजीत करणेत येतो

| **अक्र** | **लोकशाही दिन स्तर** | **लोकशाहीदिनाचा दिवस** | **लोकशाही दिनाचे अध्यक्ष्** |
|---|---|---|---|
| 1 | तालुका स्तर | महिन्याच्या तिस-या सोमवारी | तहसिलदार |
| 2 | जिल्हाधिकारी महानगरपालिका आयुक्त स्तर | प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी | मा जिल्हाधिकारी मा महानगरपालिका आयुक्त |
| 3 | विभागीय आयुक्त स्तर | प्रत्येक महिन्याच्या दुस-या सोमवारी | मा विभागीय आयुक्त |
| 4 | मंत्रालय स्तर | प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी | मा मुख्यमंत्री |

वरीलप्रमाणे प्रत्येक स्तरावर लोकशाही दिन आयोजीत करणेत येतोसदर दिवशी सार्वजनिक सुटटी असल्यास त्यानतंर येणा;या कामकाजाचा दिवस लोकशाही दिन म्हणून पाळण्यात येतो.

ज्या ज्या क्षेत्रामध्ये निवडणूकीकरीता आचार संहिता लागू असल्यास अशा ठिकाणी त्याच स्तरावरील लोकशाही दिन आयोजीत करणेत येवू नये असे शासनाचे आदेश आहेत.

वरील चारही स्तरावरील लोकशाही दिन मुख्यालय ठिकाणी सकाळी 10;00 वा आयोजीत करणेत येतो.